MO.9860898564
अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक - दिपक थोरात

| बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष -०१ | अंक -२४५ | मंगळवार दि.२८ मे २०२४ | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-01 | Issue -245 | TUESDAY DT. 28 MAY 2024 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4 |

पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर अतिरिक्त पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांचे कौतुक करावे तेवढे कमीच बीड जिल्ह्यात शांतता ठेवण्यासाठी सदैव प्रयत्न केले.

## बीड जिल्ह्यातील राजकीय नेत्यांनी यामध्ये लक्ष घालणे गरजेचे

# तरूणानों राजकारण गेलं चुलीत, एकोपा जपुन जिल्हयाच्या विकासाचा विचार करा!

# धनंजय मुंडे,पंकजा मुंडे,अशोक हिंगे, बजरंग सोनवणे मूग गिळून गप्प का?

## बीडचे पालकमंत्री कलेक्टर ऐवजी एस.पी.नंदकुमार ठाकूर चांगला माणूस बीड जिल्ह्यातील जनतेकडून एस पी च्या कार्याचे कौतुक











बीड जिल्ह्याच्या इतिहासामध्ये पहिल्यांदाच एवढा जातिवाद झाला असेल ते पण फक्त आणि फक्त लोकसभा २०२४ मतदान होण्याअगोदर व मतदान झाल्यानंतर सुद्धा बीड जिल्ह्यामध्ये जातीची भिंत कायम राहिली आहे जातीय ते निर्माण करण्याच्या उद्देशाने जातीय द्वेष निर्माण करणारे काही समाजदेशी माणसं आज सुद्धा बीड जिल्ह्यामध्ये आहेत तर यामध्ये प्रामुख्याने पाहिले तर राजकारणी लोकांनी यामध्ये जास्त राजकारण करत जातीयवाद पी ठेवण्याची चर्चा बीड जिल्ह्यामध्ये जोर धरू लागली आहे याचाच भाग म्हणून बीड जिल्ह्यामध्ये काही दिवसापूर्वी परळी तालुक्यामध्ये अनेक ट्रॉसिटी झालेले आहेत हा परळी मतदारसंघ हा पालकमंत्री व विद्यमान आमदार परळी मतदारसंघाचे धनंजय मुंडे यांचा मतदारसंघ असलेला बालेकिल्ल्यात दलितांवर अत्याचार वाढत आहेत हा फक्त राजकीय देशातूनच झालेला दलितांवरील अन्याय अत्याचार नसून या अगोदर सुद्धा परळी तालुक्यामध्ये अनेक दलितांवरती अन्याय अत्याचाराची मालिका सुरू असतानाच पुन्हा एकदा मराठा ओबीसी वाद चिकदाळलेला आहे मध्ये राजकीय नेत्यांना स्वतःचा कसा फायदा करून घ्यायचा हेच गणित फक्त त्यांच्या डोक्यामध्ये आलेला आहे केस तालुक्यातील नांदूर या ठिकाणी काही दिवसापूर्वी दोन गटांमध्ये हाणामारीचे प्रकरण झाले हा दोन्ही गटाच्या मापावरती केस पोलिसात ३०७ नुसार दीडशे जनावर गुन्हे दाखल करण्यात आल्याचे समजते परंतु हा सर्व प्रकार हा फक्त राजकारणामध्ये झालेला असून मराठा वंजारा हा वास पेटलेला असतानाच यावेळी बीडचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी कोणाची बाजू घेतली हे सर्वांना माहीत असताना यावेळी बीड जिल्हा पोलीस अधीक्षक श्री नंदकुमार ठाकूर यांनी संयम राखत शांतपणे सविस्तर प्रकरण हाताळत शांतता कायम करण्यामध्ये त्यांना यश आले त्यांच्यासोबत बीडचे अतिरिक्त पोलीस अधीक्षक श्री सचिन पांडकर हे नंदकुमार ठाकूर बीडचे पोलीस अधीक्षक यांच्या नेतृत्वाखाली संबंधित प्रकरण हाताळण्यामध्ये केस पोलीस व अतिरिक्त पोलीस सचिन पांडकर अप्पर पोलीस अधीक्षक कमलेश जी मीना साहेब सहाय्यक पोलीस निरीक्षक चंद्रकांत गोसावी यांच्या उपस्थितीमध्ये शांतता समितीची बैठक घेण्यात आली या बैठकीमध्ये मुंडेवाडी असेल किंवा नांदूर फाटा असेल या ठिकाणी मात्र नक्कीच सर्व स्वाती धर्मातील लोकांना समजून सांगण्याचे व बंधू भाव जपण्याचे आव्हान यावेळी बीडचे पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांनी आव्हान केले आहे यावेळी मात्र यावेळी बीडचे पालकमंत्री धनंजय मुंडे जिल्हाधिकारी दीपाताई मुंडे यांनी हे आवाहन करणे गरजेचे आहे व शांतता कमिटीची बैठक घेणे गरजेचे आहे परंतु त्यांना आवाहन करणे मध्ये बोलायला सुद्धा वेळ आहे का नाही असा प्रश्न यावेळी बीड जिल्ह्यातील जनतेला पडलेला आहे परंतु राजकारणातील राजकीय नेते मतदार बंधू-भगिनी यांनी ज्याला मतदान करायचे त्याला केले आता हा मतदान झाले येणाऱ्या चार तारखेला पुन्हा वादळ निर्माण होण्याची दाट शक्यता निर्माण होण्याची चिन्ह दिसून येत असतानाच?

बीडचे पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांनी शांतता कमिटीची बैठक घेऊन यावेळी सर्वांना शांतताच्या आवाहन केले आहे.

बीड /प्रतिनिधी

पोलीस स्टेशन नेकनूर हद्दीत मौजे नांदूर फाटा येथे आज दिनांक २७ ५ २०२३ रोजी १२.००ते १३.०० वाजे दरम्याने मौजे नांदुर फाटा येथे मा. पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर साहेब,मा.अप्पर पोलीस अधीक्षक पांडकर साहेब, मा.सहाय्यक पोलीस अधीक्षक कमलेश जी मीना साहेब ,मा. सहा.पोलीस निरीक्षक,चंद्रकांत गोसावी यांच्या उपस्थिती मध्ये शांतता मीटिंग घेण्यात आली. सदर बैठकीमध्ये आगामी काळातील लोकसभा निवडणूक निकाल अनुषंघाने काही समाज विघातक व्यक्ती कडून जातीय तणाव निर्माण होण्याच्या अनुषंघाने गावामध्ये सामाजिक व जातीय सलोखा अबाधित राहावा तसेच सार्वजनिक शांतता कायम रहावी या अनुषंगाने सदर बैठकीमध्ये माननीय पोलीस अधीक्षक साहेब यांनी पाढ-याचीवाडी, धावज्याचीची ,खर्डेवाडी, नारेवाडी, मुंडेवाडी ,येथील ग्रामस्थांना लोकसभा निवडणुकीचा निकाल संबंधाने तसेच सोशल मीडिया यासंबंधी योग्य ते मार्गदर्शन करून शांतता बाळगण्याचे आवाहन केले आहे.


बीड जिल्ह्यामध्ये वेगवेगळ्या पक्ष संघटना सर्व जाती धर्मातील लोकांनी संत महंत महाराज मुस्लिम समाजातील धर्मगुरू वेगवेगळ्या पक्ष संघटनेचे जिल्हाध्यक्ष बीड जिल्ह्यातील समाजसेवक या सर्वांनी यावेळी बीड जिल्ह्यामध्ये शांतता कमिटीची बैठक घेऊन बीड जिल्ह्यातील त्यांचे आवाहन करणे गरजेचे

**मराठा समाजाच्या दुकानात न जाण्याच्या ठरावाला गावकऱ्यांचे समर्थन नाहीच : एस पी नंदकुमार ठाकूर**

**पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांचा ग्रामस्थांना सामाजिक सलोखा टिकवून ठेवण्याचे आवाहन**

**संबंधित आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल...**

बीड : बीडच्या मुंडेवाडी गावातील एक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. ज्यामध्ये मराठा समाजाच्या दुकानाला जायचं नाही, हॉस्पिटलमध्ये जायचं नाही आणि कोणी गेला तर ५ हजार रुपये दंड किंवा वाळीत टाकू अशा पद्धतीचा ठराव घेण्यात आल्याचे या व्हिडिओत दिसत आहे. या व्हिडिओमुळे राज्यभरात



खळबळ उडाली आहे. या व्हिडिओची पोलिस प्रशासनाने दखल घेतली असून जातीय सलोखा बिघडवणाऱ्यांवर कारवाई केली जाईल असा इशारा पोलिसांनी दिला आहे. वंजारी समाज बहुल गाव असणाऱ्या बीडच्या मुंडेवाडी गावामध्ये आपण मराठा समाजाच्या दुकानावर जायचं नाही, मराठा समाजातील महाराजांना आपल्या

गावातील सप्ताहाला बोलवायचं नाही असा ठराव १७ मे रोजी घेण्यात आला होता. या सार्वजनिक ठरावाचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला होता. यानंतर कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी बीडचे पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर हे स्वतः मुंडेवाडी गावामध्ये पोहोचले आणि व्हिडिओमुळे गावातील सोशल फॅब्रीक खराब होऊ नये म्हणून आम्ही आज गावातील लोकांसोबत बैठक आयोजित केली आहे. नांदूरफाट्यावरही बैठकीचं आयोजन केलं असून ग्रामस्थांना चांगला प्रतिसाद आहे. लोकांमध्ये संवाद आहे. काही विशिष्ट बाबी घडल्या, पण त्या जात म्हणून नाही तर व्यवसायिक आहेत असेही ठाकूर यांनी सांगितले. याप्रकरणी व्हिडिओची दखल घेऊन आम्ही गुन्हा दाखल केलेला आहे. ही बाब गंभीर आहे. आरोपीला ताब्यात घेतलं असून प्रतिबंधक कारवाई केली आहे असेही त्यांनी सांगितले. तसेच गावकरी एकमताचे, एका मनाचे आहेत, गावातील वातावरण शांत आहे असेही त्यांनी स्पष्ट केले.त्यांनी ग्रामस्थांना सामाजिक सलोखा टिकवून ठेवण्याचे आवाहन केले. गावकऱ्यांची भेट घेतल्यानंतर पोलिस अधीक्षक नंदकुमार ठाकूर म्हणाले की, आम्ही मुंडेवाडीत पोहोचलो आहोत येथील ग्रामस्थांशी चर्चा केली. पण, इथे तसा कुठलाही प्रकार नाही. कुठल्याही समाजाने खरेदी करणे किंवा न करण्याचा निर्णय घेतलेला नाही. गावातील नांदूरफाटा येथील काही समाजकंटक त्रास देतात म्हणून अशा पद्धतीने काही घटना घडली. पण, त्यामध्ये जात हा फॅक्टर नसून व्यक्तिगत स्तरावर ते बोललेले होते. गावकऱ्यांचं त्या प्रकाराला अनुमोदन नाही. गावचे त्या ठरावाला समर्थन नाही. गेल्या १५ दिवसांपूर्वीचा तो व्हिडिओ असून गावात गेल्या १५ दिवसात कोणालाही कसलाही दंड केलेला नाही अशी माहिती पोलीस अधिक्षकांनी दिली.

# बीड शहरात दोन हजार वृक्षांची लागवड करणार- अनिलदादा जगताप

## गणपती नगर भागात अखंड हरिनाम सप्ताहा मोठ्या उत्सहात संपन्न!

बीड ।प्रतिनिधी

भरकटलेल्या समाजाला, माणसांना दिशा देण्याचे काम संत-महंत आणि महाराजांसारखी माणसं करतात. महाराजांच्या सांगण्यावरून आज या अखंड हरीनाम सप्ताहाची सांगता वृक्षारोपण करून होत आहे. आज आपण पाहतोय सर्वत्र वाढत्या उन्हामुळे आपल्याला अनेक गंभीर समस्यांचा सामना करावा लागत आहे. जिकडं पाहावं तिकडं पाण्याची समस्या उद्भवली आहे. तापमानाचा पारा ४३ डिग्रीवर जाऊन पोहचला आहे आणि हा पारा भविष्यात देखील वाढत जाणारा आहे. एका मर्यादेपर्यंतच माणूस तापमान सहन करू शकतो. त्यामुळे वाढत्या तापमानाला आळा घालण्यासाठी वृक्ष लागवड हा एकमेव पर्याय आहे. म्हणून प्रत्येकाने झाड लावणे आणि ते जगवने काळाची गरज आहे. अध्यात्मच्या या पवित्र वातावरणात महाराज आणि माता माऊलींच्या साक्षीने मी संकल्प करतो की, येणाऱ्या काळात




आम्ही बीड शहरात दोन हजार झाडांची लागवड करणार आहोत आणि ती झाड जगवणार देखील आहोत.

काल दि. २७ रोजी बीड शहरातील गणपती नगर भागात वैकुंठवासी गुरूवर्य ह.भ.प. बंकटस्वामी महाराज पुण्यतिथीनिमित्त बेलेश्वर मंदिराच्या वर्धापन दिनी अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याची सांगता झाली. अखंड हरिनाम सप्ताहाच्या शेवटच्या दिवशी कीर्तनाप्रसंगी शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप यांनी उपस्थित राहुन ह.भ.प.वसंत महाराज यांचे दर्शन घेतले. त्यांच्या कीर्तनाचे श्रवण करत उपस्थित भाविक भक्तांशी संवाद साधला. यानंतर लागलीच बेलेश्वर मंदिराजवळ सर्वांनी एकत्रित येऊन वृक्षारोपण केले. यादरम्यानच अनिलदादा जगताप यांनी येणाऱ्या काळात बीड शहरात दोन हजार झाडांची लागवड करणार असल्याची घोषणा केली. पुढे बोलताना अनिलदादा जगताप म्हणाले की, पंढरीची वारी करणाऱ्या माता-भगिनींच्या आणि महाराजांच्या आशीर्वाद अध्यात्मची शक्ती आपल्या सर्वांच्या पाठीमागे असल्यामुळे आपण प्रत्येक संकटाशी दोन हात करू शकतो. कीर्तनामध्ये सातत्याने माता माऊल्या आणि वडीलधारी मंडळी यांची उपस्थिती दिसून येते. मात्र आता कीर्तनामध्ये तरुणांची हजेरी लागणं काळाची गरज आहे.

बेलेश्वर मंदिराचे संपूर्ण ट्रस्ट गेल्या २६ वर्षांपासून अखंडित बेलेश्वर मंदिराच्या वर्धापन दिनी या सप्ताहाचे आयोजन करत आहे याचे विशेष कौतुक वाटते. अध्यक्ष अशोक पिंगळे, उपाध्यक्ष विलास घोडके, कोषाध्यक्ष असुरबा घरत, सचिव महारुद्र शेळके यांच्यासह आदी सदस्यांच्या माध्यमातून गणपती नगर, स्वराज्य नगर, बलभीम कॉलनी, बंकटस्वामी नगर, माऊली कॉलनी येथे अध्यात्मिक विचारांची जोपासना केली जात आहे. अध्यात्मिक विचारसरणीच्या मंडळींमध्ये उपस्थित राहून आत्मिक समाधान भेटल्याचे देखील अनिलदादा जगताप यांनी भावना व्यक्त केली. या कार्यक्रमा प्रसंगी शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन भैय्या मुळूक, गणपती नगर, स्वराज्य नगर, बलभीम कॉलनी, बंकटस्वामी नगर, माऊली कॉलनी या भागातून महिला भगिनी तथा ज्येष्ठांची उपस्थिती मोठ्या प्रमाणात होती.

# दोन महिला वैद्यकिय अधिकारी सांभाळतात प्राथमीक आरोग्य केंद्र !

## साडेपांच महिण्यात पांच हजार बाह्यरूग्ण तपासणी व औषधी उपचार !

### संतती नियमन शस्त्रक्रिया शंभराहून अधिक व १५ शवविच्छेदन !

शिरुरकासार(प्रशांत बाफना)

तालुक्याच्या ठिकाणी असलेल्या प्राथमीक आरोग्य केंद्र दोन महिला वैद्यकिय अधिकारी सांभाळत असुन डॉ मृणाल घुगे या रूजू झाल्यानंतर साडेपांच महिण्याच्या कालावधीत जवळपास पांच ते सहा हजार बाह्यरूग्ण तपासणी व औषधी उपचार केले शिवाय संतती नियमन शंभराहून अधिक शस्त्रक्रिया आणि पंधरा शवविच्छेदन केले गेले. गोरगरीब रूग्णांची मोफत आरोग्य सुविधा वेळेवर वगुणकारी विलाज होत असल्याने प्राथमीक आरोग्य केंद्राबाबत समाधान व्यक्त केले जात आहे .

तालुका आरोग्य अधिकारी डॉ अशोक गवळी यांचे मार्गदर्शनाखाली तालुका कार्यालया जवळच प्राथमीक आरोग्य केंद्र असुन वैद्यकिय अधिकारी म्हणून डॉ मृणाल घुगे यांनी नौकरी लागताच पहिला पदभार घेतला सोबतीला डॉ पुजा म्हस्के या दोघींनी पांच साडेपांच महिण्याच्या अवधीत जवळपास पांच हजार बाह्यरूग्णांना तपासणी करून औषध उपचार केले ,त्याशिवाय संतती नियमन शंभराहून अधिक शस्त्रक्रिया आणि पंधरा शवविच्छेदन देखील करण्यात आल्याचे सांगण्यात आले .

वेळेवर तपासणी व खात्रिशिर विलाज होत असल्याने या आरोग्य केंद्राचा गोरगरीब जनतेसाठी चांगला फायदा होत आहे ,सध्या उष्णतेचा पारा हा प्रमाणाबाहेर गेल्याने रूग्ण संखेत वाढ होतांना दिसत आहे ,हात पाय गळून जाने ,थकवा येणे , डोके अंगदुखी ,मळमळ होणे ,कंबर पाठ दुखी ,थंडी ताप खोकला असे रूग्ण दिसून येतात .शासनाकडून आरोग्य सुविधेबाबत पुरवली जात असलेली साधन सामुग्री व औषधी यांचा जास्तीत जास्त गोरगरीब जनतेच्या आरोग्यासाठी व्हावा यासाठी आपण प्रामाणीक प्रयत्न करत असल्याचे डॉ मुणाल घुगे यांनी सांगितले.आरोग्य केंद्रातील कर्मचारी यांचे सहकार्य मिळत असल्याने रूग्णांना वेळेवर सेवा देता येते असेही सांगितले .

# श्रुती शेजुळ या विद्यार्थिनी दहावी परिक्षेत ९१/.२० टक्के / घेऊन यशस्वी

बीड ।प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने मार्च २०२४ मध्ये आयोजित इयत्ता दहावीच्या परीक्षेत गेवराई तालुक्यातील खांडवी येथील विद्यार्थिनी कु.श्रुती सुभाष शेजुळ या विद्यार्थिनी शारदा विद्या मंदिर गेवराई ता. गेवराई जि बीड येथे महाविद्यालयात शिक्षण घेत आहे या वर्षी दहावी परिक्षेत ९१/२०. टक्के



घेऊन यश संपादन केले आहे

मराठी विषयात ८७ हिंदी ८१ ईंग्लिश ८२ मॅथ ९३ विज्ञान ९८ सामाजिक शास्त्र ९३ या पैकी ५०० पैकी४५३ गुण मिळवले आहे. या कठोर संघर्षातून अभ्यास करुन आपल्या आई वडीलांचे कष्टाची जाण ठेवून दहावी परिक्षेत यश संपादन केल्याबद्दल सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे

# साक्षी पवारचे दहावीच्या परीक्षेत घवघवीत यश

शिरूर कासार : शहरातील कालिकादेवी महाविद्यालयाची विद्यार्थिनी साक्षी महादेव पवार हिने दहावीच्या परीक्षेत घवघवीत यश संपादन केले असून तिने मिळविलेल्या यशाबद्दल तिचे विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून कौतुक करण्यात येत आहे. साक्षी पवार ही दहावीच्या परीक्षेत ८७.६०% गुण घेवुन विशेष श्रेणीत उत्तीर्ण झाली आहे. साक्षी हिने मिळविलेल्या यशाबद्दल सिद्धेश्वर संस्थानचे महंत स्वामी विवेकानंद शास्त्री यांच्यासह आदर्श शिक्षण संस्थेचे



सचिव तथा माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर, प्रथम नगराध्यक्ष रोहिदास पाटील गाडेकर, तहसीलदार मोहनलाल हर्णे, महाविद्यालयाचे प्राचार्य अप्पासाहेब येवले, वरिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.विश्वास कंधारे, पोलीस निरीक्षक गणेश धोकरट, प्रा.संजय तुपे, प्रा.महारुद्र डोंगरे, एकता फाउंडेशनचे अध्यक्ष साहित्यिक अनंत कराड, शिरूर तालुका आदर्श पत्रकार संघाच्या वतीने अभिनंदन करण्यात आले आहे.

# मारफळा विद्यालयाचा शालांत प्रमाणपत्र परिक्षेचा ९६.७२ टक्के निकाल

टाकरवण /प्रतिनिधी

माध्यमिक विद्यालय मारफळा शाळेचा मार्च २०२४ मधे घेण्यात आलेल्या ईयत्ता दहावी परीक्षेचा निकाल ९६.७२% लागला असून यात प्रथम क्रमांक चि. गरड अदित्य अनिल ८८. ४०% तर द्वितीय क्रमांक कु. कुटे संध्या मोतीराम ८८.०० % व तृतीय क्रमांक कु. कांबळे साक्षी अंनत ८५. ६०% मिळविले आहे.

आज माध्यमिक शिक्षण मंडळ यांनी मार्च २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालांत परीक्षा, दहावीचा निकाल घोषित केलेला आहे. त्यामध्ये माध्यमिक विद्यालय मारफळा या विद्यालयातील इयत्ता १० वी मधुन ६१ विद्यार्थी परीक्षेसाठी प्रविष्ट झाले होते त्यापैकी सर्व ५९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून, विद्यालयाचा निकाल ९६.७२% आला आहे, त्यात विशेष प्राविन्याने १८ तर प्रथम श्रेणीत ३४ व द्वितीय श्रेणीत ०७ अश्या प्रकारे विद्यार्थ्यांनी यश संपादन केले आहे.

या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मा. शिवाजीराव (दादा) पंडित,अध्यक्ष मा.अमरसिंह पंडित, सचिव मा.जयसिंह पंडित , मा.विजयसिंह पंडित, युवा नेतृत्व रणविर (काका) पंडित, पृथ्वीराजे पंडित . आमचे मार्गदर्शक श्री.डावकर सर, प्रशासकीय अधिकारी श्री.प्रमोद गोरकर सर, श्री.गोगुले सर ,श्री.हातोटे सर, मुख्याध्यापक श्री. टकले सर तसेच विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व गावकरी यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले

# तुलसी इंग्लिश स्कुलचा दहावीचा १००% टक्के निकाल

## गुणवंत विद्यार्थ्यांचे देवगिरी प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष प्रा. प्रदिप रोडे, प्राचार्या उमा जगतकर यांनी केले अभिनंदन

बीड ।प्रतिनिधी

येथील देवगिरी प्रतिष्ठान बीड संचलित तुलसी इंग्लिश स्कूलचा दहावीचा निकाल १००% टक्के लागला असून विद्यार्थ्यांनी १००% टक्के निकालाची परंपरा कायम ठेवली आहे. गुणवंत विद्यार्थ्यांचे देवगिरी प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष प्रा. प्रदिप रोडे, प्राचार्या उमा जगतकर सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे. शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये दहावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा निकाल खालील प्रमाणे आहे.

प्रथम क्रमांक क्षितिज धनवे ९४.००%, द्वितीय क्रमांक आर्या चव्हाण ९३.८०%, तृतीय हर्मिका जगतकर ९२%, आर्यन कोरडे ९२%,दीक्षा सरपते ९२% तसेच सार्थक पोकळे ९१.८०%, शेख झोया ९१.४०%, निशा मस्के ८९.६०%, कृष्णा दबडे ८९.४०%, जिया लोखंडे ८८.६०% निकाल जाहीर झाला आहे. सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे देवगिरी प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष प्रा. प्रदिप रोडे, प्राचार्या उमा जगतकर सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# शेख अदनान एजाज याचे दहावी परीक्षेत घवघवीत यश

बीड ।प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळाच्यावतीने घेण्यात आलेल्या मार्च २०२४ च्या दहावीच्या



परिक्षेत गेवराई शहरातील महावितरण विभागाचे कर्मचारी शेख एजाज यांचे चिरंजीव शेख अदनान एजाज यांने मराठी ६९, हिंदी ६३,इंग्लिश ७९, मॅथेमॅटिक्स ९१, आणि सायन्स अँड सोसिलोगी ७८ असे ६००पैकी ४०५ गुण मिळावले .त्यानें सरासरी ८१ टक्के गुणाने दहावी परीक्षेत ८१ टक्के गुण मिळवून घवघवीत यश संपादन केले. या यशाबद्दल नातेवाईकडहून व मित्र परिवार कडून अभिनंदन व कौतुक करण्यात आले.

# धोंडराई माध्यमिक विद्यालयाचा शंभर टक्के निकाल

## चि.गुंजाळ वैभव प्रथम, कु.माढेकर वैष्णवी द्वितीय तर कु.हजारे वेदिका तृतीय

गेवराई : महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या दहावी परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून सन- २०२४ मध्ये झालेल्या परीक्षेत माध्यमिक विद्यालय,धोंडराईचा शंभर टक्के निकाल लागला असून दहावीच्या परिक्षेत विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन करुन यशस्वी निकालाची परंपरा कायम राखली आहे. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे सर्वत्र अभिनंदन केले जात आहे.

जगदंबा शिक्षण प्रसारक मंडळ बीड संचलित, माध्यमिक विद्यालय धोंडराई या शाळेतून इयत्ता दहावीच्या परिक्षेत चि.गुंजाळ वैभव भारत, ८६.६० % प्रथम, माढेकर वैष्णवी राम, ८४.८० % द्वितीय तर हजारे वेदिका केशव ८४% हिने तृतीय तर जाधव पवन राजाराम ८३.६० चौथा, गावडे किरण लक्ष्मण पाचवा, खरात विशाल रवींद्र सहावा क्रमांक पटकावला असून धोंडराई माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी दहावीच्या परिक्षेत घवघवीत यश संपादन करुन यशस्वी निकालाची परंपरा कायम राखली आहे. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे माजी मंत्री शिवाजीराव( दादा) पंडित, संस्थेचे अध्यक्ष अमरसिंह पंडित, सचिव जयसिंग पंडित, माजी




जि.प.अध्यक्ष विजयसिंह पंडित, शारदा स्पोर्ट्स कडमीचे अध्यक्ष रणवीर पंडित, युवानेते पृथ्वीराज पंडित, प्रशासकीय अधिकारी प्रमोद गोरकर, सहप्रशासन अधिकारी प्रा.काशिनाथ गोगुले, मुख्याध्यापक भक्तराज पौळ यांच्यासह शालेय समितीचे पदाधिकारी,गावातील पालक वर्ग तसेच सर्व शिक्षक,शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

## बीड, अहमदनगर, धाराशिव, सातारा जिल्हयातुन मोटार सायकल चोरी करणारी आंतरजिल्हा टोळी

# स्था.गु.शा.बीड ने उघड करुन दोन आरोपी निष्पन्न करुन १० मोटार सायकली केल्या जप्त

**मा.पोलीस अधीक्षक साहेब बीड यांनी मोटार सायकल चोरीचे जास्तीत जास्त गुन्हे उघडकीस आणण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेला आदेश दिलेले आहे. त्यावरून मा.पोलीस निरीक्षक, स्था.गु.शा.बीड यांनी मोटार सायकल चोरी करणारे आरोपींची माहिती काढुन गुन्हे उघडकीस आणण्यासाठी अधिपत्याखालील अधिकारी यांना योग्य मार्गदर्शन करून आदेश दिलेले आहेत.**

त्याअनुषंगाने दिनांक २७/०५/२०२४ रोजी पोउपनि मुरकुटे स्थागुशा बीड यांना गुप्त बातमी मिळाली की, एक ईसम चोरीची हिरो होंडा पॅशन मोटार सायकल विकणेकामी सोमेश्वर मंदिर,बार्शी रोडचे बाजुला कोणाची तरी वाट पाहत गाडीवर बसला आहे अशी खात्रीशिर बातमी मिळताच पोलीस निरीक्षक स्था.गु.शा.यांना सदरची माहिती देवून पो.नि. स्थागुशा यांनी तात्काळ पोउपनि मुरकूटे यांना मार्गदर्शकन करुन पुढील कार्यवाही करण्यासाठी आदेश दिले त्यावरुन पोउपनि मुरकुटे व त्यांचे पथक तात्काळ बातमी ठिकाणी रवाना होवून सदर इसम पथकाला बघुन पळुन जाण्याचे बेतात असतांना शिताफिने पकडुन त्यास विचारपुस केली असता त्याने त्याचे नाव अविनाश उर्फ बालाजी दिनकर पायाळ वय २४ रा.थेरला ता.पाटोदा असे सांगितले. त्यास त्याचे जवळ असलेल्या मोटार सायकलचा अभिलेख पडताळणी केली असता सदर वाहन चोरीचे असल्याचे समजले. त्यास अधिक विचारपुस करता त्याने व त्याचे इतर एक साथीदार यांनी मिळुन एकुण १० मोटार सायकली मोरल्याचे निष्पन्न झाले असून त्यापैकी ०९ खालील नमुद प्रमाणे गुन्हे उघडकीस आलेले आहत. १) पो.ठा.शिवाजीनगर(बीड) गुरनं २२३/२०२४ कलम ३७९ भादंवि पॅशन प्रो २)



पो.ठा.शिवाजीनगर(बीड) गुरनं १७२/२०२४ कलम ३७९ भादंवि युनिकॉर्न ३)पो.ठा.शिवाजीनगर (बीड) गुरनं २२२/२०२४ कलम ३७९ भादंवि स्लेकिंडर ४)पो.ठा.शिवाजीनगर (बीड) गुरनं २३९/२०२४ कलम ३७९ भादंवि स्लेकिंडर ५)पो.ठा.पाटोदा (बीड) गुरनं २२३/२०२४ कलम ३७९ भादंवि स्लेंलडर ६)पो.ठा.जामखेड(अहमदनगर) गुरनं १३९/२०२२ कलम ३७९ भादंवि होंडा शाईन ७)पो.ठा. धाराशिव ग्रामीण(धाराशिव) गुरनं०१८/२०२२ कलम ३७९ भादंवि बजाज प्लॅटिना ८) पो.ठा. फलटण ग्रामीण (सातारा) गुरनं४१२/२०२४ कलम ३७९ भादंवि होंडा शाईन ९)पो.ठा. फलटण शहर (सातारा)गुरनं २२६/२०२४ कलम ३७९ भादंवि होंडा शाईन इतर एक मोटार सायकलचा मालकी हक्क व गुन्हे दाखल असल्याचा शोध घेण्याचे काम चालु आहे. सदर आरोपींनी चोरलेल्या (१०) मोटार सायकली कि.अं. ६,६०,०००/- रु च्या ह्या तपासात जप्त करण्यात आलेल्या असून सदर आरोपी कडुन मो.सा.चोरीचे इतरही गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे

आरोपी नामे अविनाश उर्फ बालाजी दिनकर पायाळ, रा.थेरला ता.पाटोदा यास १० मोटार सायकली ह्या पुढील कार्यवाहीसाठी पो.स्टे.शिवाजीनगर,बीड यांचे ताब्यात देण्यात आलेल्या आहे. उर्वरित निष्पन् एक आरोपीचा शोध घेण्याचे काम चालु असून पुढील तपास पो.स्टे.शिवाजीनगर व स्थागुशा पथक करीत आहेत. सदरची कामगिरी मा.श्री. नंदकुमार ठाकुर पोलीस अधीक्षक,बीड , मा.श्री. सचिन पांडकर अपर पोलीस अधीक्षक बीड यांचे मार्गदर्शनाखाली श्री. संतोष साबळे पोलीस निरीक्षक स्था.गु.शा.बीड, पोलीस उप निरीक्षक श्री. सिध्देश्वर मुरकूटे, सफौ/तुळशिराम जगताप, पोह/पी.टी.चव्हाण, पोह/विकास राठोड, पोह/राहुल शिंदे, पोह/देविदास जमदाडे, पोना/बाळु सानप, पोशि/अलिम शेख, पोशि/अश्विनकुमार सुरवसे, चालक पोशि/सुनिल राठोड यांनी केलेली आहे.

# वडवणी तालुक्यात असणाऱ्या पिंपळारुई ह्या गावाची विद्युत सेवा चार दिवसांपासून खंडित ...!

## चार दिवसापासून अंधारात आणि पाण्याविना कोरडे ग्रामस्थांना भोगावे लागतात त्रास..

**ना लाईट ना पाणी पण रस्त्यावर लटकतात आडव्या तारी**

वडवणी / प्रतिनिधी

वडवणी तालुक्यात शनिवार रोजी रात्रीच्या सुमारास अचानक आलेला चक्रीवादळ व पावसामुळे वडवणीसह ग्रामीण भागातील अनेक गावातील, विद्युत पोल, तारा ,या सह मोठ मोठे झाडे कोसळून जमिनीत दोस्त झाले असून अनेक नागरिकांच्या घरावरी पत्र उडाले असून घरांच्याही पडझड झालेले असून यामध्ये तालुक्यातील जनजीवन निष्क्रिय झाले आहे शेतकऱ्यांचे ही शेतातील मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले आहे वडूने तालुक्यातील गुरुवारी रोजी रात्रीच्या सभापती झालेल्या वादळ व पावसामुळे तालुक्यातील वडूनच चिंचवन कॉटरबन सोन्ना खोटा रुई पिंपळा चिखलबीड यासह इतर अनेक गावांना अक्षर साथ झोडपले असून यामध्ये पिंपळा रुई येथे गावातील लाईटचे पोल विद्युत तारेसह पडली आहे, तसेच याच विद्युत तारेचा चा नागरिकांना खूप त्रास होत आहे,परंतु यामध्ये कसलीही जीवित हानी झालेली नाही ,परंतु आर्थिक नुकसान मोठ्या प्रमाणात झाले आहे, तात्काळ नैसर्गिक संकटामुळे झालेल्या नुकसानीची पाहणी पंचनामे करून तात्काळ हा प्रश्न मिटवण्यात यावा जनतेतून मागणी होत आहे,हे पडलेले विद्युत पोल आणि तारेसह हे पूर्ण रस्त्यावरची पडलेले असून काही जीवित हानी झाल्यास याला जबाबदार कोण असा प्रश्न देखील उपस्थित होत आहे, या गावाला जोडलेली विद्युत सेवा ही चिंचवण इथून आहे, तरी येथील इंजिनियर यांचे ग्रामस्थांकडे त्यांचे याकडे दुर्लक्ष होत असताना दिसत आहे.



**तुषार धन्वेचे सुयश**

बीड ।प्रतिनिधी

तालुक्यातील कळसंबर येथील नूतन कुंडकेश्वर विद्यामंदिरचा तुषार सुधीर धन्वे याने दहावीच्या परीक्षेत ८७.२० % गुण प्राप्त करून सुयश प्राप्त केले. या यशाबद्दल त्याचे सर्वस्तरातून अभिनंदन होत आहे. तुषार सुधीर धन्वे अत्यंत गरीब कुटुंबातील असून जिद्द आणि अभ्यासाच्या जोरावर त्याने दहावी बोर्ड परीक्षेत घवघवीत यश प्राप्त केले आहे. त्याला मराठी - ८३, हिंदी - ६९, इंग्रजी - ८३, गणित - ९२, विज्ञान - ८५, इतिहास -९३ एकूण - ४३६ गुण प्राप्त केले आहेत. तर ८७. २० टक्के गुण मिळाले आहेत. याबद्दल त्याचे मामा पत्रकार उत्तम ओव्हाळ, मामी प्रतीक्षा ओव्हाळ व आई मनीषा धन्वे , सुधीर धन्वे, प्रेम धन्वे यांनी औक्षण करून त्याला शुभेच्छा दिल्या.

## चौंडी या ठिकाणी राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त मोठ्या संख्येने समाज बांधवांनी उपस्थित राहावे प्रा.संदीप गांडगे

बीड ।प्रतिनिधी

पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांची जयंती ३१.मे रोजी संपूर्ण देशभरात मोठ्या प्रमाणात उत्साहात साजरी करण्यात शासनाच्या वतीने अनेक जयंतीच्या शासकीय सुट्ट्या दिल्या गेल्या आहेत, या सुट्टीच्या औचित्य साधून समाजातील अनेक घटकांनी जयंती उत्सव मोठ्या प्रमाणात साजरा करण्यासाठी पुरेसा वेळ मिळतो महापुरुषांच्या त्यांनी केलेल्या त्यागाचा व त्यांच्या विचारांच्या आत्मसमान करतात दिनांक ३१ मे रोजी पुण्यश्लोक राजमाता



अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त महाराष्ट्रात शासकीय सुट्टी जाहीर करण्यात यावी देशभरातील सर्व शासकीय कार्यालयात गाव वाडी वस्तीवर राजमाता पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर यांची जयंती साजरी करून त्यांच्या विचाराचा वसा सर्वसामान्य माणसापर्यंत गेला पाहिजे असे आव्हान व चौंडी या ठिकाणी अहिल्यादेवी होळकर जयंती सोहळ्यानिमित्त समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आव्हान प्राध्यापक संदीप गांडगे यांनी केले आहे.

## शुभम रमेश गवळी या विद्यार्थ्याचे दहावीच्या परीक्षेत घवघवीत यश



वडवणी ।प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील आदर्श देवगाव येथील रहिवासी शुभम रमेश गवळी व महाराष्ट्र महाविद्यालय मोहा तालुका परळी येथील दहावीचा विद्यार्थी या विद्यार्थ्यांनी दहावीच्या परीक्षेत ८० टक्के गुण घेऊन यश संपादन केले, या विद्यार्थ्याला मराठी या विषयांमध्ये ६३ मार्क मिळाले, हिंदी ६८ ,इंग्रजी ७८ ,गणित ८४ ,विज्ञान आणि तंत्रज्ञान ८८ ,सामाजिक विज्ञान ८५,तब्बल ८० टक्के घेऊन हा विद्यार्थी पास झाला, या विद्यार्थ्याचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे,

## नाळवंडीच्या भूमिपुत्राने मिळवले दहावी मध्ये ८५ टक्के गुण

नाळवंडी । अमोल जाधव

राज्य शिक्षण मंडळाच्या वतीने मार्च २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या शालांत प्रमाणपत्र परीक्षा अर्थात इयत्ता दहावी परीक्षेचा निकाल आज २७ मे रोजी दुपारी १ वाजता बोर्डाने ऑनलाईन जाहीर केला आहे. औरंगाबाद विभागात सर्वप्रथम येण्याचा मान यंदाही बीड जिल्ह्याने पटकावला आहे. बीड जिल्ह्याचा विभागामध्ये सर्वाधिक ९७.४० टक्के निकाल लागला आहे,,मात्र गरीब कुटुंबातील, स्वप्नांशी झुंज देणाऱ्या आदित्य जाधव ह्या विद्यार्थ्याने आपल्या स्वप्नांना आकार देत दहावी मध्ये तब्बल ८५.२० टक्के गुण मिळवले,परिस्थिती कशीही असली तरी मनात केलेला निश्चय पूर्ण करताना आपल्या आई वडिलांची मान उंचावली,संगमेश्वर विद्यालय शिक्षण संस्थेत शिक्षण घेणारा विद्यार्थी आपल्या



गावचे नाव,आणि आपल्या शाळेचे नाव रोशन करतो याचा सार्थ अभिमान गावकऱ्यांना आहेच,शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे जो प्राशन करेल तो गुरगुरल्या शिवाय राहणार नाही,आदित्य जाधव या विद्यार्थ्याने घेतलेल्या गुणांचा सगळीकडे वाव वाव होताना दिसत आहे.त्याच्या परिवाराकडून आणि तसेच शाळेतील शिक्षकाडून आणि गावकऱ्यांकडून त्याच्या वर शुभेच्छांचा वर्षाव होताना दिसत आहे.

## क्रांतिसिंह नाना पाटील विद्यालयाचा निकाल ९६.५५ %

अंबाजोगाई ।प्रतिनिधी

तालुक्यातील येल्डा येथील क्रांतिसिंह नाना पाटील विद्यालयाचा विक्रमी ९६.५५ टक्के निकाल लागला असून विद्यालयातून विशेष प्रावीण्यासह १५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.तर प्रथम श्रेणीत २९ विद्यार्थी उत्तीर्ण तर द्वितीय श्रेणीत १२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत चि.शिंदे अतिश महादेव (८९.५९%) चि.शिंदे ज्ञानेश्वर लिंबाजी (८४.६०%) तृतीय-चि.चामनर वैभव परमेश्वर (८३.४०%) या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश प्राप्त केले असून या यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे सचिव राजपाल लोमटे,रूपाली लोमटे, सतीश लोमटे, मुख्याध्यापक विवेक गंगणे, इतर शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांच्यासह ग्रामस्थांनी अभिनंदन केलेआहे.

# किमान धार्मिक स्थळ परिसर स्वच्छता व पावित्र्य जपा - नवनाथ शिराळे पाटील

## स्वच्छता व पाणीपुरवठा याकडे प्रशासनाने लक्ष द्यावे...!

बीड ।प्रतिनिधी

बीड नगरपरिषदेत प्रशासकाच्या दुर्लक्षपणामुळे संपूर्ण शहरात घाणीचे साम्राज्य असून, सर्वत्र दुर्गंधी पसरल्याने जनसामान्यांचे आरोग्य धोक्यात आले आहे. विशेषत: शहरातील बिंदुसरा नदी काठी असणारे सोमेश्वर मंदिर, कृष्ण मंदिर, मारुती मंदिर, खासबाग तुळजाई देवी मंदिर, पीर बाले दर्गा बालेपीर, मनशूर शहा दर्गा, शहंशावली दर्गा, कंकालेश्वर मंदिर, नीळकंठेश्वर मंदिर, सावता माळी चौक आदि परिसरात प्रचंड घाणीचे साम्राज्य निर्माण झाले. मृत जनावरे, कोंबड्यांचे पंखांची घाण शिवाय शहरातील कचरा नदी किनारी टाकल्याने मंदिर, मशिद परिसरात नागरिकांना दुर्गंधीशी सामना करावा लागतो. धार्मिक स्थळ परिसरात स्वच्छता व पावित्र्य राखण्याचे काम नगर परिषदेच्या मुख्याधिकारी अंधारे मॅडम यांनी करावे असे आवाहन भाजपा जिल्हा उपाध्यक्ष तथा नगर परिषद माजी सभापती नवनाथ शिराळे पाटील यांनी केले आहे.

तसेच मान्सून पूर्व बीड शहराची नाले साफ सफाई, कचऱ्याचे ढीग उचलून तातडीने साफ सफाई करणे आवश्यक आहे. शहरात तीव्र पाणी टंचाई



असून, अद्याप अनेक भागात टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात नाही. गोरगरीब जनतेची पाण्यासाठी होणारी वणवण थांबवण्यासाठी नगर परिषद प्रशासनाने तातडीने दखल घ्यावी. यापूर्वी वारंवार मागणी करूनही मुख्य अधिकारी व प्रशासक यांनी गांभीर्याने दखल घेतलेली नाही. तरी आठ दिवसाच्या आत नाले सफाई, पाणी पुरवठा वेळेवर केला नाही तर भाजपा जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्या मार्गदर्शनाखाली लोकशाही मार्गाने आंदोलन केले जाईल असा इशार नवनाथ शिराळे यांनी केला आहे.

# इतरांच्या भावनांचा सन्मान कराल तेव्हाच लोक तुमचाही सन्मान करतील

## मुंडेवाडी प्रकरणानंतर वंजारी समाजातील एका ऊसतोड कामगार पुत्राचे पत्र सोशल मीडियावर व्हायरल ...तेव्हा कुठं गेला होता माणुसकी धर्म? काळजाला हात घालणारे तरुणाचे प्रश्न

बीड ।प्रतिनिधी

आज मुंडेवाडी गावाने जे केलं ते एका क्शनची रिएक्शन होती. त्या गावाला आजूबाजूच्या गावांनी मागील काही महिन्यात जी हीन वागणूक दिली, त्याची परतफेड करण्यासाठी गावकऱ्यांनी व्यक्त केलेली उद्विग्न प्रतिक्रिया होती. मराठा समाजाने आरक्षणाच्या लढाईच्या नावाने सुरू केलेला लढ्याचे नकळत राजकीय लढाईत रूपांतर झाले व त्याचा सर्वाधिक त्रास लोकसभेच्या उमेदवार पंकजा मुंडे यांच्यासह अनेक गावातील वंजारी व इतर ओबीसी समाजांना सुद्धा सहन करावा लागला. मात्र आज मुंडेवाडी गावाला मराठा समाजाच्या व्यावसायिकतेवर बहिष्कार घालतात सुलोख्याच्या व माणुसकी धर्माच्या आठवणी काढत अनेक जण पुढे आले आहेत व बहुतांश ऊसतोड कामगार असलेल्या वंजारी समाजाला दूषणे देत आहेत. मात्र खरंतर आजवर तुम्ही कुणाचाही सन्मान केला नाही मात्र आता जर खरंच सलोखा आणि माणूसकी धर्म टिकवायचा असेल तर आधी इतरांचा सन्मान करायला शिका, मगच लोक तुमचा सन्मान करतील, अशा आशयाचे मराठा समाजाला उद्देशून असलेले वंजारी समाजातील एका ऊसतोड कामगाराच्या मुलाचे अनावृत्त पत्र आज सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाल्याचे पाहायला मिळाले.

लोकसभा निवडणुकीच्या आधी, लोकसभा निवडणुकीमध्ये व लोकसभेचे मतदान झाल्यानंतर अशा तीन प्रमुख टप्प्यांमध्ये ज्या प्रकारचा उन्माद, पंकजा ताईंकॅबि आडवणूक, त्याचबरोबर वेगवेगळ्या नेत्यांनी दिलेल्या धमक्या, पसरवलेली दहशत, वंजारी व ओबीसी समाजातील इतर घटक जातींना वेळोवेळी दिलेली हीन दर्जाची वागणूक या सर्वच गोष्टींचे भीषण वास्तव या पत्रात मांडले असून यातले शब्द ना शब्द वाचकांच्या काळजाचा ठाव घेणारे आहेत. द्वेष पसरवण्याचे दुकान काढून बसलेले काहीजण व त्याआडून आपला राजकीय हेतू साध्य करण्यासाठी काही जातीतील लोकांना टार्गेट करणारे राजकीय नेते, यांच्या डोळ्यात झनजनीत अंजन घालणारे तर सोशल मीडियावर एका विशिष्ट जातीसाठी इतर सर्वांनाच तुच्छ समजणाऱ्या सोशल मीडिया वीरांना हे पत्र नक्कीच विचार करायला लावणारे आहे.

पाहूया पत्रात नेमकं काय लिहिलंय?

मराठा समाजाला उद्देशून एका वंजारी ऊसतोड कामगाराच्या मुलाने लिहिलेले अनावृत्त पत्र

माझ्या प्रिय 'मोठ्या भावा'...

राम राम .....

आमचा राम राम तरी घेणार आहेस का तो ही बंद केलास.....

मुंडेवाडी या एका गावच्या लोकांनी मराठा समाजाच्या व्यवसायिकतेवर बहिष्कार घातल्याचे कळताच रागावून लाल झालेलं तुला पाहिलं, मनाला कुतूहल वाटलं माझ्या की आपण जे आजवर पेरलं आज तेच रिएॅक्शन होऊन फक्त एका गावात आपल्या अंगलट आलं तर किती वाईट वाटलं तुला! आता तुला सलोखा, गावगाडा, माणुसकीचा धर्म आठवायला लागला. पण मागील काही महिन्यांपासून आम्ही काय काय सहन केलंय ते बघ एकदा, म्हणजे तुला काही प्रश्न पडतील... आशा आहे की वाचून प्रतिक्रिया नक्की कळवशील.

आरक्षणाची तुझी लढाई तू लढत असताना आम्हीही किमान पाणी तरी पाजलेच की रे ...पण ओबीसी नेत्यांची लेकरं-बाळ घरात असताना घरं पेटवून दिली गेली, तेव्हा माणुसकीचा धर्म कुठं गेला होता? आमच्या ताईची, भाऊची घरे जाळण्याच्या जाहीरपणे धमक्या दिल्या जात होत्या, तेव्हा तुझ्यातला सलोखा कुठं होता? अरे मराठा समाज बहुल असलेल्या गावात ओबीसी-बलुतेदार मेला तर त्याच्या मातीला जाणं बंद केलं तुम्ही, एका गावात दोन-दोन पार केले तुम्ही, तेव्हा कुठं गेला होता सलोखा?

ह्यांचे दवाखाने नको, डॉक्टर-वकील नको, दुकान नको, हे फतवे तर आधीच काढले की तुम्ही गावागावात, व्हाट्सअप्प वरून...!निवडणूक लागली तसे ह्यांना पाडा, तुम्ही आहेतच किती? हलक्या जातीचे, छोट्या जातीचे म्हणून कुणी-कुणी कितीदा हिनवलं रे आम्हाला, तेव्हा माणुसकी धर्म कुठं होता? त्याला जातीवाद म्हणत नाहीत का?

एका एका गावात, त्या बिचाऱ्या आमच्या ताईला झुंडी करून ठरवून अडवलं तुम्ही, तोंडावर घोषणाबाजी करून अपमानित करून हाकलून दिलं तुम्ही, तेव्हा माणुसकी धर्म कुठं होता? तेव्हा कितीरे असुरी आनंद घेतलास? अरे कधीतरी बजरंग सोनवणेला अडवून विचारलं का, आरक्षणाच्या लढाईत तुझं काय योगदान आहे म्हणून? ताई वंजाऱ्याची म्हणून तिलाच अडवलंत फक्त, तो जातीवाद नव्हता का? अरे जिल्ह्यात कुठंतरी वंजारी किंवा इतर कुठल्या ओबीसीने बजरंगला अडवले का? नसते जमले का आम्हाला, आमच्या गावात आल्यावर? केलास का कधी विचार?

आम्हाला हलक्या जाती म्हणून मोठमोठे नेते हिनवत होते तेव्हा कितीरे गुदगुल्या झाल्या तुम्हाला? जरांगे पाटलांचे आंदोलन या वर्षभरात गाजलेले पण मागील अनेक वर्षांपासून मराठा आरक्षणासाठी लढलेला, प्रसंगी आरक्षणावर भाषण करताना रक्ताच्या उलट्या केलेला आमचा धनु भाऊ सुद्धा टोचला तुम्हाला. अरे किती आमदार, जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, असे किती किती सहकारी मोठे केले ताईने आणि भाऊने, आणि आमच्या मोठ्या साहेबांनी.... त्यांचा समाज बघून का? स्व. मुंडे साहेबांना धनुभाऊ नी सोडलं ते मराठा समाजातल्या देशमुखांना नगराध्यक्ष करण्यासाठीच ना ! त्या भाऊच्या नावाने सुद्धा द्वेष पेरला तुम्ही?

अरे जिल्ह्यातील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या जाती काढून हिनवले, पण त्याच अधिकाऱ्यांनी महाराष्ट्रात सर्वात जास्त, ८२ हजार पेक्षा जास्त कुणबी प्रमाणपत्र वाटलेत, त्याचा मात्र सपशेल विसर पडला तुम्हाला? मराठा आंदोलन पेटल्यानंतर ओबीसींचे सुद्धा मेळावे होऊ लागले, पण जातीय सलोखा बिघडू नये म्हणून ताई किंवा भाऊ त्या मेळाव्याला गेले नाहीत, पण ते तुला दिसलं नसेल!

बरं वंजाऱ्यांना विरोध म्हणून ताई-भाऊला विरोध असेल इथपर्यंत समजलं मला, पण यार भाजपला का मतदान केलं म्हणून तुम्ही बिचाऱ्या नाभिकांची दुकाने फोडली, ब्राम्हणांच्या घरांवर हल्ले केले? कोणत्या माणुसकीच्या धर्मावर हे घडलं, सांगशील का?आठवतंय का भावा तो 'जयोस्तु मराठा' नावाच्या व्हाट्सप ग्रुपला मतदानाच्या आदल्या दिवशी तुमचा तो संवाद, वंजारी, धनगर, माळी, बंजारा यांना मतदान करायला येऊ देऊ नका, आले की ठोका, अमुक-तमुक... बरंच काही होतं घाण-घाण पण ते इथं लिहिण्यासारखं नाही, आठव जरा ती दहशत, आमच्याबद्दल वापरलेली शिवी गाळीची भाषा... द्वेष आणि तो उन्माद, ते सगळं पटलं का तेव्हा मनाला तुझ्या?

तुमचा विरोधी उमेदवार म्हणतो मुंडे, बांगर, दहिफळे मतमोजणीला नकोत, मग आम्ही काय म्हणून इतरांवर विश्वास ठेवायचा? आम्ही पण म्हणायचं का मराठा नकोत? कधीतरी त्याला असं वागू नकोस म्हणून सल्ला द्यायची हिम्मत केलीस का? राहून राहून आम्हालाच का सजा देता? एक इंजेगाव बोगस मतदान झालं म्हणून राष्ट्रीय पातळीवर तुम्ही बदनाम केलं तुम्ही.... तेव्हा मसाजोग, जवळबन, सारणी, आनंदगाव, हाजीपुर, गाजीपुर अशा २७ पेक्षा जास्त गावात तुम्ही दिवसभर ढोल वाजवून सांगत होतात की आम्ही अख्खे गावं ताब्यात घेतलीत, तेव्हा लोकशाही कुणी तुडवली होती? त्याचा नाही जाब विचारणार तुम्ही?

आज मुंडेवाडी गावाने जे केलं ते एका ऍक्शनची रिऍक्शन आहे, होय आहेच! त्या गावाला वेढलेल्या आजूबाजूच्या गावांनी जी हीन वागणूक मुंडेवाडीच्या लोकांना आजवर दिली त्याचीच परतफेड करण्याचा ठराव गावकऱ्यांनी घेतलेला दिसतोय. नांदूर फाट्यावर मुंडे वाडीकरांना मागील काही महिन्यात काय काय भोगाव लागलंय ते जाऊन पहा प्रत्यक्षात, मग कळेल. आता आठव ना गावोगाव पारावर बसून घेतलेल्या शपथा, गावोगाव केलेले ठराव, मुंडे येऊ द्यायचे नाही, त्यांना मत मागायला आले तरी हाकलून द्यायचे, त्यांना मदत करणाऱ्या मराठ्यांना सुद्धा बहिष्कृत करायचं, हे सगळं कुणी पेरलं रे?

आज ठरवून काहीजण मुंडेवाडीच्या आडून सलोख्याचे दुकान मांडत आहेत, गावातले व्हीडिओ मीडिया मध्ये त्यांनीच पेरले आहेत. म्हणजे पुन्हा आम्हाला बदनाम करण्याची ही एक संधी तुम्ही बनवलीय!अरे तुमच्याच कारखान्यांवर ऊस तोडून, काबाड कष्ट करून जगणारा आमचा भोळा-भाबडा आणि हलका समाज, आज इतका का परका आणि वैरी वाटू लागला तुम्हाला?

गावगाडा आणि गाव कुसावरचा 'राम राम' बंद पडू नये ही माझी पण मनोमन इच्छा आहे पण ती तुझीही मनातून इच्छा असेल व पूर्ण करायची असेल तर मोठ्या भावाने मनाचा मोठेपणा सुद्धा दाखवावा लागेल, सगळं विसरून पुढं जाऊ भावा, फक्त आमच्या भावना समजून घे, आम्हाला हलके म्हणून हिनवू नको, तू जेव्हा इतरांच्या भावनांचा सन्मान करशील तेव्हा लोक तुझाही सन्मान करतील...

बघ मनाला पटतंय का?

तुझाच एक हलका

लहान भाऊ

# ग्रामीण भागात पाणी टंचाईच्या तिव्र झळा

## जिल्हा प्रशासन वातानुकूलित कार्यालयात पाणीटंचाई आढावा बैठका घेऊन निर्धास्त :- डॉ.गणेश ढवळे

लिंबागणेश ।प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात मागच्या पावसाळ्यात समाधान कारक पाऊस झाला नसल्याने ग्रामीण भागातील लोकांना पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे.एप्रिल व मे महिन्यात पडलेल्या तिव्र उन्हामुळे जिल्ह्यातील जवळपास सर्वच धरणांनी तळ गाठला आहे.१४३ धरणांमध्ये केवळ ४ टक्केच पाणीसाठा शिल्लक आहे.जिल्ह्यातील लघु ,मध्यम प्रकल्प कोरडे पडल्याने जमिनीतील पाणी पातळी घटल्याने विहिरी, बोअरवेल कोरड्याठाक पडल्याने पाणी पातळी खालावल्याने अनेक गाव वाड्या तांड्यावर तिव्र पाणीटंचाई निर्माण झाली आहे. उन्हाळा सुरू झाल्यानंतर ग्रामीण भागात दरवर्षी पाणीटंचाई सुरू होते.ग्रामीण भागातील महिलांना पहाटेपासूनच पाण्याच्या शोधार्थ पायपीट करावी लागते.त्यात महिला आणि लहान बालके यांच्या डोक्यावर हंडे, घागरी,सायकलला अडकवलेली केंड, घागरी व इतर माध्यमातून पाणी मिळवण्यासाठी त्यांची धावपळ दिसुन येते.अलीकडे पुरुष मंडळी घरातील महिलांसोबत पाणी भरण्याच्या मदतीसाठी येत असल्याचे चित्र सर्वत्र दिसून येत आहे.जिल्हा प्रशासनाचे प्रयत्न मात्र तोकडे पडताना दिसत असुन जिल्हा प्रशासन पाणीटंचाईचा आराखडा वातानुकूलित रुम मध्ये बसुन प्रसारमाध्यमांतुन पाणीटंचाई वर मात करण्यासाठी आवाहन करत निर्धास्त असल्याचे दिसून येत आहे.

बीड तालुक्यातील पोखरी (घाट) येथील २०० लोकसंख्या असलेली भोसले नामक दलित वस्ती.सार्वजनिक विहीरीत भायाळा साठवण तलावातुन आठवड्याला पाणी सोडले जाते.७ परस विहीरीतील पाणी शेंदुन सांडपाण्यासाठी वापरावं लागते. पिण्याच्या पाण्याची अवस्था बिकट आहे. संपूर्ण वस्तीला सध्या एकाच हातपंपाचा आधार असुन अधुन मधुन १०-२० हंडे पाणी येते त्यामुळे लहानमुले आपला नंबर येण्याची वाट बघत असतात.संपुर्ण वस्तीला पिण्याच्या पाण्याचा



पुरवठा होत नसल्याने बोअरवेल द्यावा अशी ग्रामस्थांची मागणी आहे.संबधित प्रकरणी सरपंच मुळीक यांच्याशी संपर्क साधला असता पंचायत समितीकडे बोअरवेल आणि टँकरचा प्रस्ताव मार्चमध्येच पाठवला असुन अजुन प्रशासनाकडून सकारात्मक निर्णय येण्याची वाट पहात असल्याचे सरपंच बिभीषण मुळीक यांनी सांगितले.

बीड जिल्हा प्रशासनाने वातानुकूलित कार्यालयात पाणीटंचाई आराखडा आखताना पाणीटंचाईच्या अनुषंगाने टँकर मंजुरीबाबत काही अडचणी असल्यास संबंधित उपविभागीय अधिकाऱ्यांना तसेच पाणीटंचाई विषयी काही तक्रार असेल तर जिल्हा परीषदेच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता यांच्याशी संपर्क साधला असे आवाहन जिल्हाधिकारी दिपा मुधोळ यांनी केलेले आहे. मात्र संबंधित प्रकरणात आधिका-यांशी संवाद साधल्यानंतर फक्त आश्वासनच पदरी पडताना दिसत आहे.केंद्र सरकार पुरस्कृत जलजीवन मिशन अंतर्गत प्रति व्यक्ती ५५ लिटर पाणी देण्याची घोषणा हवेतच विरल्याचे दिसून येत आहे.

ग्रामीण भागातील बहुतांश जलशुद्धीकरण केंद्रे धुळखात पडुन असुन अशुद्ध पाण्यामुळे अतिसार ,काविळ,विषमज्वर आदि जलजन्य आजार पसरत असतानाच विहिरीतल्या आणि बोअरच्या पाण्यात जास्त प्रमाणात क्षार आढळतात. खरडुन पाणी उपसा करत असल्याने जंतुसंसर्गाचा धोका अधिक असतो.ग्रामिण भागातील बहुसंख्य महिलांच्या शरीरात रक्त कमी असल्याने निमिया आजाराची थकवा येणे, चालताना दम लागणे आदी तक्रारी असतात. मुळातच शरीरात कॅल्शियमचे प्रमाण कमी असल्याने विहिरीतुन पाणी शेंदल्याने तसेच डोक्यावरुन पाणी वाहुन आणण्यामुळे मणक्यांच्या आजारांचे आढळून येतात.

# ऊसतोड मजुराच्या घरावर वीज पडून संपूर्ण घर जळून खाक

## मुलीच्या लग्नाला आणलेल्या तीन लाखाची राख..! आर्थिक मदत देण्याची ऊसतोड मजूर शेतकऱ्यांची मागणी

वडवणी/ प्रतिनिधी

महाराष्ट्र सह बीड जिल्ह्यामध्ये अवकाळी संकटात ने शेतकरी त्रस्त झालेल्या दिसून येत आहे. त्याचाच एक भाग धारूर तालुक्यामध्ये एका ऊसतोड मजूर शेतकरी कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. त्याच्या घरावर चक्क वीज पडून, संपूर्ण घर जळून खाक झालय. सध्या उन्हाळा असल्यामुळे लग्न सराई चालू आहे. आपल्या मुलीच्या लग्नासाठी व्याजाने सावकाराच्या दारात आपलं स्वाभिमान खान ठेवून, मुलीच्या बापानं तीन लाख आणलेले, त्यांच्या भावनांसह पैशाची राख झाली आहे. ती घटना दिनांक २६ रोजी चार पाचच्या सुमारास घडली. धारूर तालुक्यात असणारा घागरवाडा शिवारात सोनखेडा वस्तीवर ही घटना घडली आहे. शेतकरी अंकुश नागरगोजे यांच्या घरावर विज पडल्यावेळी घरामध्ये आठ व्यक्ती होते. ईश्वराची कृपा एकही व्यक्तीला काही गालबोट



लागलं नाही. विज पडतात क्षणी संपूर्ण, घरातील व्यक्ती ओरडत बाहेर पडले, असं त्यांच्याकडून सांगण्यात येत आहे. संपूर्ण शासकीय कागदपत्रासह तील लाख रु जळाल्याने त्यांना आसमानी संकटाने घेरल्याचे चित्र दिसत आहे. शासकीय लोकांनी पंचनामा केला आहे, मात्र त्यांना काय आर्थिक मदत मिळते या गोष्टीकडे संपूर्ण जिल्हा वाशियांचे लक्ष लागले आहे.

खरात आडगावात घाणीचे साम्राज्य, गावकऱ्यांच्या आरोग्याकडे

# ग्रामपंचायतीचे दुर्लक्ष

प्रतिनिधी । माजलगाव

माजलगाव तालुक्यातील खरात आडगावात घाणीचे साम्राज्य, गावकऱ्यांच्या आरोग्याकडे ग्रामपंचायतीचे दुर्लक्ष झाल्याने खरात आडगाव येथील गावातील संपूर्ण रस्त्यांवर घाणीचे साम्राज्य पसरले असून नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. याकडे ग्रामपंचायत प्रशासन मात्र पूर्णपणे दुर्लक्ष करत असल्याचे नागरिकांतून बोलले जाते या गावामध्ये मूलभूत सुविधांचा मोठ्या प्रमाणात अभाव आहे. ह्या सुविधा पुरवण्यासाठी ग्रामपंचायत प्रशासन पूर्णपणे अपयशी ठरत आहे. गावांमध्ये बहुतांश रस्त्यांचे बांधकाम झालेले नसल्याने गटारं देखील बांधण्यात आलेली नाहीत. त्यामुळे



गावातील संपूर्ण सांडपाणी व पावसाचे पाणी रस्त्यावर संपूर्ण सांडपाणी रस्त्यावर तुंबल्याने सर्वदूर गटारे साचली आहेत, असा आरोपही गावकऱ्यांनी केला आहे. या साचलेल्या पाण्यात मोठ्या प्रमाणात डासांची उत्पत्ती होत आहे. सोबतच दुर्गंधीमुळे देखील नागरिक बेजार झाले आहेत. त्यामध्ये जिल्ह्यामध्ये डेंग्यू आणि मलेरियाचा प्रादुर्भाव होत असल्याने या घाणीचे साम्राज्या परसल्याने गावकऱ्यांचे आरोग्य धोक्यात आले आहे. यासंदर्भात नागरिकांनी वेळोवेळी तोंडी तक्रारी केल्या, मात्र ग्रामपंचायतीने दुर्लक्ष केले असे गावकऱ्यांनी सांगितले आहे. त्यामुळे जिल्हा प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन स्थानिक ग्रामपंचायत सचिव आणि इतर यंत्रणेवर कारवाई करावी अशी मागणी करण्यात आली आहे



गहिनीनाथ गडाचे महंत विठ्ठल महाराज यांच्या गाडीला अपघात झाल्यावर त्यांना रुबी हास्पिटल पुणे येथे उपचार सुरू आहेत माजीमंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी भेट देऊन प्रकृतीची चौकशी केली


# गेवराई शहरातील लक्ष्मी लॉजमधील कुंटनखान्याचा पर्दाफाश!

## एका महिलेसह तीन जण पोलिसांच्या ताब्यात ; गुन्हा दाखल

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई : शहरातील वर्दळीच्या ठिकाणी असलेल्या लक्ष्मी लॉजमध्ये कुंटनखाना सुरु असल्याची माहिती अनैतिक मानवी वाहतूक कक्षाच्या पोलीस उपनिरीक्षक मिना तुपे यांना मिळाली. मिळालेल्या माहितीच्या आधारावर पोलिसांनी सापळा रचला आणि सोमवारी छापा मारत मॅनेजर, लॉज मालक आणि एका महिलेला ताब्यात घेतले आहे. या प्रकरणी गेवराई पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यता आला आहे.

याबाबत सरविस्तर माहिती अशी की, गेवराई शहरातील लक्ष्मी लॉज येथे कुंटनाखाना सुरु असल्याची माहिती पथकाला मिळाली. मिळालेल्या माहितीच्या आधारावर पोलिसांनी सापळा रचत एक डमी ग्राहक पाठवला आणि कुंटनखान्याचा पर्दाफाश केला. यावेळी



लॉजचा व्यवस्थापक कैलास सोमिनाथ भोसले (वय २९ रा. कवडगाव ता. गेवराई), लॉज मालक रामेश्वर किसनराव प्रभाळे (वय ४२ रा. गेवराई) यांच्यासह एका महिलेला पोलिसांनी ताब्यात घेतले.

याप्रकरणी गेवराई पोलीस ठाण्यात कलम ३, ४, ५, अनैतिक व्यापार प्रतिबंध कायदा १९५६ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला. ही कारवाई पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर आणि उपअधीक्षक राजगुरु यांच्या मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतूक कक्षाच्या पोलीस उपनिरीक्षक मिना तुपे, सहायक फौजदार वाळके, पोशि. सतीष बहिरवाळ, महिला पोलीस नाईक चंद्रभागा मुळे, सुरेखा उगले आणि चालक नरवडे यांनी केली असल्याचे संबंधित अधिकाऱ्याच्या वतीने सांगण्यात आले आहे.


# प्रस्थापितांच्या विरोधात गेवराई विधानसभा निवडणूक लढवणार.बाळासाहेब सोलंकर

## प्रस्थापित विरुद्ध विस्थापित असा संघर्ष येणाऱ्या काळात दिसणार

**बीड ।प्रतिनिधी**

**गेल्या अनेक दिवसापासून गेवराई मध्ये पंडित पवार घराण्याची सत्ता आहे. कुठेतरी ह्या प्रास्तापितांच्या सत्तेला सुरुंग लावला पाहिजे यासाठी एक ऊसतोड कामगाराच लेकरू म्हणून येणारी गेवराई विधानसभा निवडणूक लढून मोठ्या मताधिक्याने जिंकून येणार हे मी नाही ठरवलं तर गेवराई मधील ओबीसी बांधवांनी ठरवलेल आहे.गेवराई विधानसभा मतदारसंघांमध्ये ओबीसींची संख्या मोठ्या प्रमाणात आहे.जितनी जिनकी संख्या उतनी उनकी भागेदारी.**

आता गेवराई विधानसभेला एसी च्या गाडीत बसून फिरणारा आमदार नको शेतकऱ्यांच्या वाड्यावर जाऊन शेतकऱ्यांचे प्रश्न जाणवणारा वाटेल तेव्हा फोन उचलून आधार देणारा आधारवड पाहिजे यासाठी गेवराई तालुक्यातील सकल ओबीसी समाजाने



ठरवलेला आहे येणाऱ्या विधानसभेला आम्हाला ओबीसीचाच उमेदवार हवा असून त्याच उमेदवाराला मी लाखोच्या मताने निवडून आणून दाखवणार.

गेवराई तालुक्यामध्ये कुठली एमआयडीसी नाही कुठला मोठा उद्योग नाही मोठ्या प्रमाणावर तोरणाची बेरोजगारी वाढलेली आहे कुठलाही विकास झालेला नाही या सगळ्या गोष्टीची स्वप्न पूर्ण करण्यासाठी आगामी विधानसभा निवडणूक लढवून मोठ्या मताधिक्याने निवडून येणार. असं यावेळी गेवराई तालुक्यातील युवा नेते बाळासाहेब सोलंकर यांनी म्हटले आहे

# १० वीच्या परीक्षेत ७५.८० % गुण घेवून शेख जैद चे यश

गेवराई ।प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील तलवडा या जिल्हा परिषद माध्यमिक शाळेचा आज दिनांक २७ मे २०२४ सोमवारी १० वी परिक्षेचा निकाल जाहीर झाल्यानंतर या शाळेतील विद्यार्थी



शेख जैद शेख जुनेद ने ७५.८०% गुण प्राप्त करून उज्वल यश प्राप्त केले आहे. या यशाबद्दल शेख परिवाराच्या वतीने जैद चे कौतूक करण्यात आले आहे तसेच जिल्हा परिषद शाळेच्या मुखध्यापक व शिक्षकानी अभिनंदन केले आहे तसेच लोकशाही पत्रकार संघाचे कार्याध्यक्ष व शासकीय गुत्तेदार अय्युब खान पठाण यांनी सुद्धा अभिनंदन व पुढीलवाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहे.

# कामखेडा हायस्कूलचा निकाल शंभर टक्के

**बीड ।प्रतिनिधी**

**तालुक्यातील आदर्श शिक्षण संस्था संचलित कामखेडा हायस्कूल कामखेडा, तालुका जिल्हा बीड विद्यालयाने प्रति वर्षाप्रमाणे उज्वल यशाची परंपरा कायम राखली आहे. इयत्ता दहावी बोर्ड परीक्षा मार्च २०२४ परीक्षेचा निकाल शंभर टक्के लागला आहे.**

या दहावी बोर्ड परीक्षेत विद्यालयातून एकूण ३३ विद्यार्थी बसले होते त्यापैकी विशेष प्राविण्यसह १९ विद्यार्थी, प्रथम श्रेणीत अकरा विद्यार्थी, द्वितीय श्रेणीत तीन विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून, विद्यालयातून सर्वप्रथम कु. नेवडे कोमल गोकुळ ८८.२०% सर्व द्वितीय कु. भडके अस्मिता अशोक ८७.६०% व सर्व तृतीय कु. शिंदे आरती विलास ८५.८०% घेऊन विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. विद्यालयाच्या उज्वल यशाबद्दल जयदत्त अण्णा क्षीरसागर, रोहित क्षीरसागर, आदर्श शिक्षण संस्थेचे प्रशासन अधिकारी प्रा.डॉ. राजू मचाले, कार्यकारी अधिकारी राऊत, विद्यालयाचे मुख्याध्यापक राजेंद्र कुऱ्हे, इयत्ता दहावीचे वर्गशिक्षक मोमीन बिलाल, भांडवलकर, मोरे, लेहने, धापसे, शेख, मचाले, श्रीमती. शेख, श्रीमती राऊत, शिक्षकेत्तर कर्मचारी राऊत, शेख तलहा, सर्व कामखेडा, कांबी, पवार तांडा ग्रामस्थांनी व परिसरातील पालकांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT